# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


**महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे**

क्रमांकः प्रनिप्रा/प्र.क्र. ६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/९८८ दिनांक : 31 OCT 2019

## "परिपत्रक"

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश छाननी/पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया.....**

**संदर्भ :**
**१) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे क्रमांक प्रनिप्रा/प्र.क्र.६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/८८४, दिनांक २१/०९/२०१९ रोजीचे पत्र**
**२) प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे क्रमांक बैठक-१५१८/प्र.क्र. १५७/प्रनिप्रा/८२४, दिनांक ७/०९/२०१९ रोजीचे पत्र.**
**३) मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ७/०८/२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ५ मधील निर्देश.**
**४) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदी.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण, संबंधीत संचालक व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/संस्थां यांनी प्रवेश मान्यतेबाबत पार पाडण्यात येणारी कार्ये नमूद केलेली आहेत. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यते संदर्भात अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ७/०८/२०१९ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. ०५ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार सदरील प्रक्रिया प्राधिकरणाच्या सफलता पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे व तद्नुषंगाने प्राधिकरणाचे निर्देश सर्व संबंधीतांना संदर्भ क्र. १ व २ येथील दिनांक ७/०९/२०१९ व २१/०९/२०१९ रोजीच्या पत्राने कळविण्यात आलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यता प्रक्रियेचे संपूर्ण कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याच्या अनुषंगाने तसेच अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे गांभीर्य लक्षात घेऊन, प्राधिकरणाच्या "सफलता" या ऑनलाईन पोर्टलवर प्रवेशीत विद्यार्थ्यांची माहिती खातरजमा/शहानिशा करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी/छाननी, प्रक्रिया शुल्काचा भरणा व प्रवेश मान्यता या करिता खालील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधीतांना निर्देश देण्यात येत आहेत,-

| अ. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १) | संबंधीत संस्था/महाविद्यालय यांनी प्राधिकरणाच्या "सफलता" पोर्टलवर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या माहितीची शहानिशा/ खातरजमा करणे संमत करणे | दिनांक ५/११/२०१९ ते १५/१२/२०१९ |
| २) | महाविद्यालय/संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवश्यक प्रमाणपत्र व "प्रक्रिया शुल्काचा" (प्राधिकरणाच्या मान्यतेस अधीन राहुन मागील शैक्षणिक वर्षाच्या सुत्रा प्रमाणे) भरणा करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे | दिनांक ५/११/२०१९ ते १५/१२/२०१९ |
| ३) | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतूदींस अनुसरुन संबंधीत संचालकांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावाची छाननी/तपासणी करुन प्रमाणित केलेले प्रस्ताव सफलता पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्राधिकरणास सादर करणे. | दिनांक ३१/१२/२०१९ अखेर पर्यंत |

वरील प्रक्रियेसंबंधी अधिक माहितीकरिता दूरवध्वनी क्र. ०२२-२२०१६१५९ (Ext. No. 912, 913, 914) व ara.helpline@gmail.com हा ईमेल संपर्कासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींचे गांर्भीय लक्षात घेऊन, वरील वेळापत्रकानुसार राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी व संबंधीत संचालकांनी कार्यवाही करणे बंधनकारक आहे, तद्नंतर या संदर्भात प्राप्त होणाऱ्या विनंती/निवेदनांचा विचार केला जाणार नाही, **तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रमाणित केलेला मान्यता प्रस्ताव विहित कालावधीमध्ये प्राधिकरणास प्राप्त न झाल्यास तद्नंतर असे कोणतेही प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भातील प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून कार्यवाहीकरिता ग्राह्य धरण्यात येणार नाही व तद्नुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने भविष्यात कोणतेही न्यायालयीन प्रकरण घडल्यास, त्यास सर्वस्वी संबंधीत महाविद्यालय / संस्था / संचालक जबाबदार राहील,** याची सर्वांनी गांर्भीयाने नोंद घ्यावी, असे आपणास कळविण्याचे मला निर्देश आहेत.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**आयुक्त व सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**मुंबई.**

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत वरीप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता तथा उक्त निर्देश संचालकांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या विनंतीसह अग्रेषित,-

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. उपसचिव (तांशि - २), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. उपसचिव (शिक्षण - २), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,-
१. सर्व परिक्षा समन्वयक / सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
२. परिक्षा सल्लगार, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
३. विशेष कार्य अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण / राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
४. मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे.

प्रत,-
१. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक.
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक,
३. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.